<u>प्रेसनोट दि. १२/०४/२०१९</u>

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**विनापरवाना, अनाधिकाराने, बेकायदेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी बनावटीचे स्टेनलेस स्टीलचे पिस्टल व दोन जिवंत राऊंड बाळगले बाबत.**

---

दि. १०/०४/२०१९ रोजी पोलीस उप-निरीक्षक गिरीष सोनावणे, पोलीस शिपाई ८३१० दत्ता सोनावणे व पोलीस शिपाई ८३८७ दयानंद तेलंगेपाटील असे सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीत गस्तीवर असताना पोलीस शिपाई ८३१० दत्ता सोनावणे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रिलॅक्स हॉटेल शेजारी, नांदेड फाटा येथे दोन इसम उभे आहेत. त्यापैकी एक अंगाने सडपातळी असुन त्याचे अंगात काळा फुल शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्टे असुन त्याचे कमरेला पिस्टल सारखे हत्यार दिसत आहे. दुसरा अंगाने मजबुत आहे. त्यांची हालचाल संशयास्पद दिसत आहे. सदरची बातमी पोलीस उप-निरीक्षक गिरीष सोनावणे यांनी वरिष्ठांना कळवुन त्यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पोलीस उप-निरीक्षक गिरीष सोनावणे हे पोलीस स्टाफसह रिलॅक्स हॉटेल शेजारी, नांदेड फाटयाजवळ, सिंहगडरोड या ठिकाणी गेले. मिळालेले बातमीप्रमाणे सदर ठिकाणी दोन इसम संशयास्पदरित्या उभे असलेले दिसले. मिळालेल्या बातमीप्रमाणे त्यांची खात्री झाल्याने त्या दोन्ही इसमांना जागीच पकडुन त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारता त्यांनी आपले नाव १) समीर राजाराम गवस, वय २९ वर्षे, रा. रुम नं. ८, वाबळे चाळ, पाण्याचे टाकीशेजारी, वडगाव बुा. पुणे व २) पवन कृष्णा कांबळे, वय २४ वर्षे, रा. पावणजाई मंदिरासमोर, घुलेनगर, वडगाव बुा. पुणे अशी त्यांनी त्यांचे नाव व पत्ता सांगीतले. त्यापैकी इसम नामे समीर राजाराम गवस याचे कमरेस डावे बाजुस पँटचे आतमध्ये एक पिस्टल मिळाले. तसेच इसम नामे पवन कृष्णा कांबळे याचे पँटचे उजव्या खिशात दोन जिवंत राऊंड मिळाले. त्यांच्याकडे शस्त्र परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांच्याकडे शस्त्र परवाना नसल्याचे सांगीतले. सदरचे अग्निशस्त्र कोठुन विकत घेतले याबबत त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी सदरचे अग्निशस्त्र हे इसम नामे रमेश बाल गोविन्द रा. सर्व्हे नं. २५, नारायणी इंडस्ट्री, खाडे औदयोगीक चाळ, नांदेड फाटा, ता. हवेली, जि. पुणे याचेकडुन विकत घेतलेबाबत सांगीतले. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे पोलीस उप-निरीक्षक गिरीष सोनावणे, पोलीस शिपाई ८३१० दत्ता सोनावणे व पोलीस शिपाई ८३८७ दयानंद तेलंगेपाटील यांनी इसम नामे रमेश बाल गोविन्द याला नमुद दिलेल्या पत्त्यावरुन ताब्यात घेतले आहे.

इसम नामे समीर राजाराम गवस, वय २९ वर्षे, रा. रुम नं. ८, वाबळे चाळ, पाण्याचे टाकीशेजारी, वडगाव बुा. पुणे व पवन कृष्णा कांबळे, वय २४ वर्षे, रा. पावणजाई मंदिरासमोर, घुलेनगर, वडगाव बुा. पुणे यांनी रिलॅक्स हॉटेल शेजारी, नांदेड फाटा, सिंहगडरोड, पुणे या ठिकाणी विनापरवाना, अनाधिकाराने, बेकायदेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी बनावटीचे स्टेनलेस स्टीलचे पिस्टल व दोन जिवंत राऊंड बाळगले असताना मिळुन आल्याने तसेच इसम नामे रमेश बाल गोविन्द, रा. सर्व्हे नं. २५, नारायणी इंडस्ट्री, खाडे औदयोगीक चाळ, नांदेड फाटा, ता. हवेली, जि. पुणे याने सदरचे अग्निशस्त्र बेकायदेशीरपणे विक्री केल्याने मा. पोलीस सह आयुक्त सो. यांचे आदेशाने पुणे शहरात शस्त्र, लाठया, काठया, वापरण्यास बंदी आदेश असताना त्याचा भंग केला म्हणुन सदर इसमांचे विरुध्द आर्म ॲक्ट कलम ३,७(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यांना दाखल गुन्हयात दि. १०/०४/२०१९ रोजी २०.४० वा. अटक करुन पोलीस उप-निरीक्षक गिरीष सोनावणे, पोलीस शिपाई ८३१० दत्ता सोनावणे व पोलीस शिपाई ८३८७ दयानंद तेलंगेपाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.